# प्रभुतरुण

वर्ष ४८ | अंक १ | मुंबई | जुलै २०१४ | पाने ६ | किंमत रु. १

*(स्थापना : तारीख २५ ऑगस्ट १९२३)*

**तत्त्वाचा बंदा जीव । मूर्तीला कोण विचारी?**

**www.prabhutarun.org**

*संपादिका:* **सुहासिनी कीर्तिकर** *कार्यकारी संपादक मंडळ :* **मिनाक्षी जयकर, मयुरा नायक, संजना कोठारे, वैजयंती कीर्तिकर**

*संपादकीय*

## तीळ आणि तांदूळ

**—सुहासिनी कीर्तिकर**

**तीळ**

गेल्या महिन्यात राम पटवर्धन गेले. पटवर्धनांचा दुसरा मुलगा अनिरुद्ध माझा विद्यार्थी. सुरुवातीच्या काळात त्यानं फार संकोचानं स्वत:ची ओळख मला खाजगीत भेटून सांगितली होती. म्हणाला, 'वडिलांनी तुम्हाला खास सांगायला सांगितलंय.' मग ती 'तशी' ओळख मीही लक्षात ठेवली. ठेवावीच लागली. कारण राम पटवर्धनांचा, माझा साहित्यरसगुण एकच होता. मी विद्यार्थिनी असताना तरुण पटवर्धन काही प्रसंगी शंकर वैद्यांच्या घरी भेटले होते. सरोजिनी वैद्यांशी त्यांची जास्त मैत्री होती. मग साहित्यिक चर्चा रंगत. मी तेव्हा वयाची शिंगं फुटलेली. त्यात गंमत म्हणून हिरीरीने भाग घेत असे. वैद्यसरांच्या मुलाच्या लग्नात ते या ओळखीला जागून मुद्दाम मला भेटायला आले होते. काळ वाहतच राहिला. तो वाहतच असतो. पुढे वैद्यबाई गेल्या. त्यांच्यावर मी लिहावे अशी 'विवेक'कडून विनंती झाली. 'विवेक'मध्ये तो लेख आल्यावर माझ्या त्या लेखावर तो आवडल्याची अनेकांची प्रतिक्रिया होती. माझ्या आठवणीप्रमाणे त्यात डॉ. सुधा जोशी होत्या; रवींद्र पिंगे होते, खुद्द वैद्यसर होते. पटवर्धनही होते. त्यांनी तर मला पत्रच पाठवले होते. त्या लेखाचा समारोप त्यांच्या म्हणण्यानुसार 'फार चटका लावून जाणारा, बांधीव आणि खराखुरा' होता. मी त्या लेखात म्हटलं होतं की 'वैद्यबाई मरणासन्न असताना हॉस्पिटलच्या त्या रूमबाहेर वैद्यसर सतत पहारा देऊन होते. पण हा पहारा चुकवून काळ आलाच. वैद्यसरांनी हे दु:ख कसं पेलावं? पण पेलतील ते! कारण वैद्यबाईंनी जसा ज्ञानेश्वर पचवलाय् तसा वैद्यसरांनी तुकाराम-' अशा काही लेखनाला मनापासून दाद द्यावी ती पटवर्धनांनीच. मी पुढे 'साहित्य'ची संपादक झाले. माझं एक पानी 'संपादकीय' त्यांना फार आवडायचं. 'मौजे'तल्या गुरुनाथ सामंतांना तसं ते बोलून दाखवायचे. याच काळात अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष म्हणून मारुती चितमपल्ली निवडून आले. त्यांचा मुंबई मराठी साहित्य संघातर्फे सत्कार होता. त्यांच्याविषयी बोलणार कोण? अटळपणे राम पटवर्धनांचे नाव मी घेतले. फार छान बोलले ते. त्या सत्कार समारंभाचं आयोजन, सूत्रसंचालन माझ्याकडे होतं. बोलताना त्यांनी काही संस्कृत संदर्भ दिला. सूत्र पुढे सरकवताना तोच संदर्भ वाढवत मी चितमपल्ली निसर्गाला कसं 'शाधिमाम्!' म्हणतात ते सांगितलं. कार्यक्रमानंतर राम पटवर्धनांनी माझी पाठ थोपटली! खरंच. असा दाद देणारा, जाणता 'माणूस' लाभणं हे दुर्लभच. मला तो लाभला. आता पटवर्धन गेले. उरल्या फक्त आठवणी!

योगायोगानं त्याच दिवशी महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री राहिलेल्या आणि नुकत्याच झालेल्या निवडणुकांनी दिल्लीत राष्ट्रपातळीवर मोठे पद सन्मानाने लाभलेल्या भाजप नेते श्री. गोपीनाथ मुंडे यांचाही दुर्दैवी मृत्यू झाला. पटवर्धन नव्वदीनंतर गेले; तर गोपीनाथराव वयाच्या साठीनंतर गेले. 'पराधीन आहे जगती पुत्र मानवाचा'! एरवी काही फार आठवले नसते. पण ते गेल्यावर त्यांच्या संबंधातल्या काही आठवणी मनाच्या तळातून आपोआपच वर आल्या. मला 'आदर्श शिक्षक पुरस्कार' लाभला तो उपमुख्यमंत्री गोपीनाथ मुंडे यांच्या हातून. दिवाकरांच्या नाट्यछटेचा आधार घेऊन म्हणायचे तर 'तेवढेच प्रकाशात'! अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन परळी-वैजनाथला झाले तेव्हा मी अ. भा. म. सा. महामंडळाच्या कार्यकारिणीवर होते. मुंडे यांच्या आयोजक-हिमतीवरच ते संमेलन उभे होते. महामंडळाच्या तेथल्या आधीच्या सभांना ते उपस्थित असत. (खूप उशीरा येत. लेट

(पान २ कॉलम १ वर)

*विस्तारीत संपादकीय*

## का रे अबोला!

**—संजना कोठारे**

'वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा' हे शब्द टाइप करताना क्षणभर थांबले. मी हे काय करीत आहे हा विचार करण्याएवढातरी वेळ मला मिळाला म्हणण्यापेक्षा, वेळ मी काढला. काही वर्षांपूर्वी कोणत्याही नातेवाईक किंवा मित्रांच्या वाढदिवसाला माझा न चुकता सकाळी फोन असायचा. वर्षभर जरी मी त्यांच्याशी बोलले नाही तरी वाढदिवस मात्र चुकायचा नाही. स्वत:ला जणू काही मी तशी शिस्त लावलेली. आपल्या वाढदिवसाला कोणी न चुकता आपली आठवण काढत आहे या गोष्टीचा आनंद त्या व्यक्तीच्या आवाजातून भासायचा. मला स्वत:ला समाधान की आपण कोणालातरी केवळ त्याची आठवण काढून आनंद देऊ शकलो. वर्षातून एक वैयक्तिक संभाषण, ते नातं जोपासण्यासाठी परिपूर्ण होतं.

काळ सरत गेला. तंत्रज्ञानाने मनुष्याला गुलाम केले आणि तो माणुसकी आणि भावनांचा वध करत गेला. दूरध्वनीमुळे दुरावा मिटल्यासारखा वाटला तोच मोबाईल फोनमुळे वाढत गेला. सुरुवात झाली ती एसएमएसने आणि आता 'चॅट'वर येऊन पोहोचलाय. साध्या साध्या गोष्टींसाठी 'मोबाईल चॅट'चा वापर अपरिहार्य झाला आहे. पूर्वी आपल्या मित्रमंडळी आणि नातेवाईकांचे वाढदिवस बऱ्याच जणांना पाठ असायचे. त्यानंतर कॅलेंडरवर लिहून ठेवायची सवय होती. कॅलेंडर पाहूनच फोन केला जायचा असे नाही, परंतु वर्षअखेरी नूतन वर्षाचे कॅलेंडर येताच सर्वांचे जन्मदिवस आणि लग्नाचे वाढदिवस या दोन्ही गोष्टी त्या कॅलेंडरवर लिहिण्याचा कार्यक्रम बऱ्याच जणांचा असायचा.

संबंध वाढत गेले आणि यादी मोठी होत गेली. सोयीस्कर 'एसएमएस'ची सवय अंगवळणी पडत गेली. कामातून वेळ काढणे कठीण होत गेले आणि त्या नात्यांना दुरावण्याची पहिली पायरी या 'मोबाईल'नी गाठली. कामातून वेळ काढून शुभेच्छा व्यक्त करणे एसएमएसमुळे सोपे होत गेले. मध्यंतरी 'ई-कार्डस्' बऱ्यापैकी लोकप्रिय झाले होते कारण त्यामुळे दुकानात जाऊन कार्ड घेण्यासाठी लागणारा वेळ वाचत होता. परंतु आता त्या 'ई-कार्ड'चे महत्त्वही कमी होत चालले आहे. कारण 'वॉटसॅप' आणि 'फेसबुक' सारखी सोशल नेटवर्किंग माध्यमे त्याहून सोयिस्कर होत चालली आहेत. 'वॉटसॅप' आणि 'फेसबुक'वर वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा हे मोजून ३ शब्द लिहिले की आपण आपले कर्तव्य पार पाडले अशी भावना सर्वसामान्यरित्या आढळायला लागली.

या सर्व गोष्टी तंत्रज्ञानामुळे सोयीस्कर होत गेल्यामुळे काही दूर असलेल्यांशी संबंध वाढत गेला आणि जवळ असणाऱ्यांशी दुरावा. आपण हे विसरत चाललो आहोत की आपल्याला एकमेकांना भेटण्यात किंवा फोनवर बोलण्याचे बंधन नाही. तरीसुद्धा 'एसएमएस' किंवा 'चॅट'चा वापर केला जातो. साधे आमंत्रण द्यायचे झाले तरीसुद्धा उचलला फोन आणि'वॉटसॅप'वर टाकला मेसेज. एखाद्या ग्रुपवर आमंत्रण टाकले की कोणी वाचले न वाचले, आपण आमंत्रण दिले आहे हे सिद्ध करायला मोकळे.

हे 'चॅट' प्रकरण एवढे लोकप्रिय झाले आहे की प्रत्यक्षात समोरासमोर यायची वेळ आली की तोंडून शब्द फुटत नाहीत. 'चॅट'शिवाय बऱ्याच जणांना भेटल्यावर काय बोलायचे सुचत नाही.परंतु 'चॅट'वर मात्र तासन्तास गप्पा हाणू शकतात. याचे कारण वैयक्तिक पातळीवर कोणाशी प्रत्यक्षात बोलायला कोणाला वेळ काढायची इच्छा नाही आणि आता तर सवयच नाही राहिली. केवळ 'चॅट फ्रेंडस्' अशी कृत्रिम नाती हल्ली पाहायला

(पान २ कॉलम ३ वर)

(पान १ कॉलम २ वरून)

लतीफ!) फार बोलत नसत. पण लक्षात येई की हे त्यांचे गाव आहे आणि त्यांचा शब्द अखेरचा आहे. संमेलनाच्या आदल्या दिवशी त्यांच्यासह आम्हाला परळी-वैजनाथच्या ज्योतिर्लिंगाच्या दर्शनाचा खास निमंत्रित म्हणून लाभ झाला. दुसऱ्या दिवशी सकाळी आठ वाजता ग्रंथदिंडी होती. पण हाय रे दैवा! पहाटे चार वाजता रेल्वेच्या दोन गाड्यांची भीषण टक्कर याच स्थानकात झाली. फार मोठा अपघात होता तो. आमच्या हॉटेलच्या निवासस्थानीसुद्धा तो आवाज घुमला. एकच गदारोळ. सर्व मदत, सेवा तिथे वळली. मुंडे त्यात सर्वांत पुढे होते. अशा पार्श्वभूमीवर दिंडी काढायची नाही असा आमचा ठराव झाला. पण त्या दिंडीची तयारी अनेकांनी तीन महिने आधी केली होती. दिंडीत सामील होण्यासाठी शाळकरी मुले विविध वेषात सजून तयार होती. बैलगाड्या , ताफे, इतर दृश्यसंचालनाचे घोळके सकाळी सातपासून ठिकाणावर तयार होते. पण नैसर्गिक आपत्ती मोठीच होती. त्याचं काय? हो-नाही करता करता सकाळी साडेअकराला मुंडे नियोजित स्थळावर आले. म्हणाले, 'अपघाताचं गालबोट आहे. पण दिंडी काढायचीच.' त्यानंतर मग पुढचे कार्यक्रम सुरळीत झाले. मुंडे यांचे नेतृत्व, लोकांमध्ये असलेला त्यांच्याविषयीचा आदर अन् विश्वास, त्यांची अशा परीक्षेच्या प्रसंगी निर्णय घेण्याची क्षमता तेथे प्रत्ययास आली. ते संमेलन त्यांची परीक्षाच घेत होते की काय; नकळे! संमेलन उन्हाळ्यात होते. दुसऱ्या दिवशी वळीवाचा मोठ्ठा पाऊस आला. मंडपात सगळी धावाधाव. वीज गेली. पण पोलिसांनी संरक्षक कडे करून एवढ्या पंचवीसएक हजार माणसांच्या जमावाला शिस्तीने सुरक्षित ठिकाणी नेले. या पोलिसांबरोबर स्वयंसेवक होते. मुंडेही होते. मंडपाची डागडुजी करून पाऊस गेल्यावर पुन्हा 'साहित्याचा पाऊस' सुरू करण्याची जबाबदारीही त्यांनी लीलया पेलली. त्याच परळी-वैजनाथला विजयोत्सवासाठी परतताना त्यांचा अपघाती मृत्यू झाला. झालेल्या नुकसानाची आता डागडुजी कोण करणार?

**तांदूळ**

सुखदु:खाचा लपंडाव चालूच असतो. उन्हातून सावलीत जाण्याचे सुख. हे दोन मृत्यू उन्हासारखे. तर सुखाची सावली म्हणजे महाराष्ट्राची लेक राष्ट्राच्या लोकसभेची अध्यक्ष झाली. चिपळूणच्या पूर्वाश्रमीच्या साठ्ये म्हणजेच इंदूरच्या सुमित्राताई महाजन एकमताने लोकसभाध्यक्षपदी निवडल्या गेल्या. २००१ साली अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन इंदूरला होते. मी तेव्हा महामंडळाची कार्यवाह होते. ताईंचा (सगळे इंदूर त्यांना 'ताई'च म्हणते.) तेव्हा जवळून संबंध आला. संमेलनाआधीच्या इंदूर, मुंबईच्या संयुक्त सभांना महामंडळ अध्यक्षा वसुंधरा (पेंडसे-नाईक) आणि संमेलन निमंत्रक समितीच्या अध्यक्षा ताई. एक साम्यवादी (कम्युनिस्ट), दुसऱ्या भाजपच्या हिंदुत्ववादी. 'संमेलन मंचाचा रंग भगवा नको' यावरून वाद-प्रतिवाद. ताई ठाम; तर वसुंधरा तत्त्वासाठी हेकट. अशावेळी सभा तणावग्रस्त होत. एकदा असंच झालं. खाजगी गप्पांमध्ये वसुंधरा मुंबईत बोलल्या काहीतरी. त्याचे 'काहीतरीच' रूपांतर एका सदस्याने ताईंपर्यंत पोहोचविले. सभेत यावर मग खडाजंगी. सभा संपल्यावर वसुंधरा कशाल्याशा बाहेर गेल्या होत्या. मी तेव्हा त्या सदस्याला म्हटलं की, 'बाबा, तुम्ही खाजगीतल्या विधानांना स्वत:पाशीच ठेवायचं होतं. उगाच अधिकृत वाद निर्माण झाले ना!' गं. ना. जोगळेकरांनी माझं म्हणणं उचलून धरलं. खास बात म्हणजे ताई उत्स्फूर्तपणे म्हणाल्या, 'कीर्तिकरबाई, तुम्ही म्हणता ते खरंय्. खरं म्हणजे अनधिकृत गोष्टींना अधिकृत चर्चेत मीच वाव द्यायला नको होता. मी एक धडा शिकले यातून.' तेव्हा त्या लोकसभेत बालविकास-महिला विकासाच्या मंत्री होत्या. पण त्यांची अनुभवातून शिकण्याची ही वृत्ती मला फार आवडून गेली. म्हणूनच त्या काळात त्यांचे कधी दडपण जाणवले नाही. संमेलनात तर त्या दिंडीला आमच्यासह फुगडी खेळायलाही पुढे होत्या. हसतमुख प्रसन्न व्यक्तिमत्व. पण वेळ आली तर तत्त्वासाठी करारी. झालं काय की, याच संमेलनात एक अतिप्रसिद्ध कवी (साहित्यिक, आमदार, चित्रगीते लोकप्रिय म्हणून दबदबा असणारे असे) होते. त्यांची आलिशान निवासात राहण्याची, खाण्याची सोय होती. पण 'पिण्याची' नव्हती! त्यांचे दारूचे बील २००१ साली सहा हजार झाले. सुमित्राताई आल्या माझ्याकडे. म्हणाल्या, 'तात्त्विकदृष्ट्या हे महामंडळाला चालणार आहे का?' मी वसुंधरांच्यावतीने खात्री देऊन म्हटले की नाहीच चालणार. कारण तो खर्च निमंत्रक संस्थेचा होता. मग झाऽऽलं. इतिहासात पहिल्यांदाच त्या कवीला ते सहा हजार रुपये भरावे लागले! खूप आकांडतांडव झालं. पण दहशत बसली त्या आमच्या काळात. गंमत म्हणजे संमेलनाध्यक्ष विजया राजाध्यक्ष होत्या. इंदूरच्या त्या तीन दिवसातच त्यांच्या नातीचा वाढदिवस होता. त्यांच्या 'सूट'मध्ये तो साजरा झाला. विजयाबाईंनी आपणहून त्याचा वेगळा खर्च केला अन् तसं मला सांगितलं. सुमित्राताई हसायला लागल्या. या संमेलनात आम्हाला शाली न मिळता इंदुरी साड्या अन् सदऱ्यांची कापडं मिळाली. सुमित्राटच! त्यांनी तो तो माणूस नजरेसमोर ठेवून स्वत: खरेदी केली होती. हा 'बाईपणा'चा टच!

पुढे २००७ साली भोपाळला महामंडळाचा वर्धापन दिन साजरा झाला. सुमित्राताईंच्या पुढाकाराने. कलाकार नीतिश भारद्वाज खास ताईंचे पाहुणे म्हणून आले होते. त्यांच्याशी सर्वांचा परिचय करून देताना जो तो आपापले नाव सांगत होता. माझी पाळी आल्यावर सुमित्राताईंनीच माझा नावासकट परिचय करून दिला. २००१ ते २००७ या वर्षात केवढे अंतर. पण ताईंचं स्मरण लख्ख. या लख्ख स्मरणाचा आश्चर्यकारक अनुभव मला १२ साली चिपळूणच्या संमेलनात आला. मी महामंडळात नव्हते. परिसंवादातील एक वक्ता होते. म्हणून संमेलनदिवशीच चिपळूणला गेले. पहाटे पाच वाजता चिपळूणला गाडी आली. फलाटावर अंधार. माझ्या सोबत कुणीच नव्हते. मी सामान घेऊन पुढे सरकले. मागून एकानं येऊन मला हटकलं. म्हणाला, 'ताई तुम्हाला बोलावताहेत.' बघितलं, तर सुमित्राताई! पहाटेच्या अंधारात, इतक्या वर्षांनी त्यांनी मला पाठमोरं ओळखलं होतं. मग त्यांच्याच गाडीनं मी माझ्या हॉटेलवर. दिंडीला परत भेट. मनमोकळा संवाद.

मला वाटतं; असा स्मरणाचा ठेवा, मनमोकळेपणा, संवाद साधण्याची हातोटी, तत्त्वासाठी ठाम वागणं, सामान्य माणसालाही स्वत:च्या ऋजू स्वभावानं ओढ लावणं, सुसंस्कृत वागणं हेच त्यांचं बळ आहे. साधेपणा हे या अजूनही सौंदर्यवती असलेल्या ताईंचं तेज आहे. अशा तेजस्वीनीला लोकसभेच्या अध्यक्ष झाल्याबद्दल मन:पूर्वक शुभेच्छा!

*

विस्तारीत संपादकीय

(पान १ कॉलम ४ वरून)

मिळतात. आज जर 'मोबाईल' फोन नसतेच तर आपण प्रत्यक्षात भेटून किंवा न जमल्या प्रत्यक्षात फोन करून बोललोच असतो नाही का? परंतु मोबाईलसारख्या तंत्रज्ञानाचा दुरुपयोग होत असल्याचे पाहून वाईट वाटतं.

या 'चॅट' पद्धतीमुळे एकमेकामध्ये संभाषण कमी होत चालले आहे. दुराव्याबरोबर संशय आणि चुकीचे समज वाढत चालले आहेत. या सगळ्यामुळे नाती दुरावली जात आहेत. या सगळ्याची जबाबदारी आपलीच आहे. तंत्रज्ञानाचा योग्य वापर न केल्याचा हा परिणाम. या उत्तम शोधाचा योग्य वापर केला असता तर दुरावलेली नाती पुन्हा एक होऊ शकली असती. एकमेकाचे संबंध अजूनही बळकट झाले असते. परंतु हल्ली एका घरामध्ये प्रत्येक व्यक्तिकडे स्वत:चा वैयक्तिक मोबाईल फोन असल्यामुळे परिवार विभागला गेलेला आढळून येतो. परिवाराचा प्रत्येक सदस्य घरात असूनही प्रत्येकाच्या हातात मोबाईल दिसून येतो. मोबाईल हातात असणे वाईट नाही, परंतु निराशाजनक आणि धक्कादायक गोष्ट अशी की हे सदस्य एकमेकाच्या जवळ असूनसुद्धा प्रत्येकजण तिसऱ्या व्यक्तिशी 'चॅट' करताना आढळून येतो.

त्यामुळे कुटुंब आणि त्यातल्या सदस्यांची नाती डगमगत चालली आहेत. काळजी वाटते ती पुढच्या पिढीची. जी या पिढीला सामान्य समजत आहे. शाळा, महाविद्यालयातील मुले या संस्कृतीला आपले समजायला लागली आहेत. अतिशय वाईट वाटतं या मुलांना पाहून. जेव्हा मुले लपंडाव, लगोरी, कॅरम, पत्ते यासारखे खेळ सोडून एकमेकाच्या मोबाईलमध्ये डोकावून नवीन मोबाईल गेम्स आणि ॲप्लिकेशन शिकत आहेत. मला माझ्या लहानपणीचे दिवस आठवले की भावंडांबरोबर घालवलेले, मोठमोठ्याने हसत खिदळत खेळ खेळल्याचे दृश्य समोर येते. जेव्हा हल्लीची पिढी मोबाईलमध्ये डोकावताना पाहते तेव्हा वाईट वाटतं की या मुलांनी लहानपण उपभोगलंच नाही.

मी असे म्हणत नाही की, मोबाईलच्या व्यसनापासून मी मुक्त आहे. मोबाईलचे व्यसन मलाही आहे आणि या व्यसनापासून माझ्यासकट आपल्या सर्वांची सुटका व्हावी हीच इच्छा आहे. कारण व्यसन कोणतेही असो त्यामुळे नाती दुरावली जातात हे सत्य आहे. आपणच नकळत साठवून ठेवलेल्या अबोल्यामुळे नात्यातला दुरावा वाढत चालला आहे, ही काळजी करण्यासारखी गोष्ट आहे. या क्षणाला कदाचित आपल्याला या गोष्टीचे गांभीर्य लक्षात येणार नाही परंतु जेव्हा आपल्याला दिसून येईल की, आपली पिढी नाती सोडून आप्पलपोटी झाली आहे तेव्हा या स्थितीला कारणीभूत स्वत:ला समजावे. वेळ अजून सरली नाही. नात्यामध्ये तेवढी ताकद असतेच की ते शेवटच्या टोकावरूनसुद्धा पुन्हा मागे फिरू शकतात. तेवढी दृढता आणि चिकाटी असेल तर नाती सांभाळणे कठीण नाही.

मोबाईलमुळे एकमेकांमध्ये झालेला दुरावा संवादाने मिटू शकतो. त्यासाठी गरज आहे असलेला वेळ आपल्या परिवारासोबत संभाषण करून घालविण्याची. 'कुटुंब' हा शब्द सार्थ करण्यासाठी कुटुंबाचे सदस्य असणे, कर्तव्य पूर्ण करणे, हे अत्यंत गरजेचे आणि महत्त्वाचे

(पान ६ कॉलम ४ वर)

लेखांक ७

# माणूस म्हणून-

## सहचर

-डॉ. सुमन नवलकर
(मोबाईल-९८६९०२८९६७)

ती दोघं ट्रेनची वाट पाहत उभी होती. 'ट्रेन खचाखच भरून आली तर सोडून द्यायची; बसायला जागा मिळेल असं दिसलं, तरच चढायचं' असं ठरलं होतं. लोकल ट्रेन असली तरी लांबच्या पल्ल्याची असली तर गर्दी ठरलेलीच असते. पण कधी-कधी लागोपाठ दोन गाड्या आल्या, तर नंतरच्या गाडीत ऐस-पैस जागाही मिळते. तसंच झालं. अभया आणि अर्जुनना चक्क खिडकीपाशी शेजारी-शेजारी बसायला मिळालं. तेही ट्रेन ज्या दिशेने जाणार त्या दिशेने. तोंड करून असलेल्या बाकावर सों-सों वारा अंगावर घेत दोघं विसावली. पण हे सगळं दोघं ट्रेन थांबता-थांबता चपळाईने आत शिरली होती म्हणून. कारण डबा लगेच भरला. केवळ बसायच्या जागाच नव्हे, तर मधली उभं राहायची जागाही गच्च भरून गेली.

तेवढ्यात समोरच्या एका बाकावरचा खिडकीकडचाच एक प्रवासी उठला. साहजिकच उभं असलेल्या एका वयस्क जोडप्यापैकी स्त्री त्या जागेवर बसण्यासाठी दोन बाकड्यांमधल्या आडव्या अरुंद पट्टीत सरसावली. 'थांब. आधी त्यांना बाहेर पडू दे, मग जा तू आत.' नवऱ्याने बायकोला अडवलं. हे तर तिलाही ठाऊक होतं. कदाचित् खूप हुशार नसेलही ती, पण इतके पावसाळे आयुष्यात काढल्यावर इतकं तर समजतच असणार तिला. पण 'हो-हो, कळतं मला. सांगायला नको.' असं काही ठणकावून न सांगता ती उभ्या जागीच थांबली. मुकाट्याने त्या प्रवाशाला बाहेर पडू दिलं आणि मगच आत शिरून त्या जागेवर बसली.

'काय हे नवरे! स्वत:लाच शहाणे समजतात. सांगायची काही गरज होती का त्याला? ती थांबलीच असती ना आपण होऊन?' अभया पुटपुटली. 'त्याने सूचना केली नसती, तरी घुसणार थोडीच होती ती? सगळी अक्कल काय त्यालाच आहे? पण बायको मूर्खच आहे असं समजून आपलं सांगत राहायचं सारखं.' अभया मनातल्या मनात फणफणत होती.

''म्हंऽऽऽ'' तेवढ्यात एक जोरदार हुंकार ऐकू आला. एक तरूण आपल्या जागेवरून उठला होता. त्याचा हुंकार ऐकून त्याच्यापासून लांब बसलेली एक सडसडीत तरुणी आपण बुरखा सावरत उठली आणि धावत आली त्याच्या पाठी. अभयानं पाहिलं, तर दोघांना पलीकडच्या एका बाकावर शेजारी-शेजारी जागा मिळाली होती.

''मुका आहे वाटतं.'' अभयाला शंका आली. अर्जुनने मान डोलावली. ''पाहिलंस? मुका आहे, पण हुंकारातही अरेरावी किती आहे, नाही रे?'' हाक पण नसेल कोणाची इतक्या जोरात, इतका याचा हुंकार. अख्ख्या डब्याला ऐकू गेला असेल. ती पण किती चपळाईने आली त्याच्या पाठी. जरबच असणार तशी. बिचारी जणू त्याच्या हुंकारच्याच प्रतीक्षेत असल्यासारखी. आणि तो? मुका असला तरी शेवटी नवरेगिरीच करणार ना?

डाव्या हाताच्या खिडकीपाशी साधारण तीस-पस्तीस वर्षांचे नवरा-बायको समोरा-समोर बसले होते. नवरा मजेत बसून प्रवासाचा आनंद घेत होता. म्हणजे तसं आनंद घेण्यासारखं विशेष काही नव्हतं प्रवासात. पण तो आपली नजर डब्यात चोहीकडे टाकून अनुभवसमृद्ध होत होता. ती मात्र सतत खिडकीबाहेर दृष्टी ठेवून. पण एखाद्या लहान मुलाने लुकलुकत्या डोळ्यांनी खिडकी बाहेरचं हलतं दृश्य टिपावं आणि गाडीच्या वेगात हिंदकळावं, तसं काही पाहणं नव्हतं ते. सक्ती लादलेली एक आज्ञाधारक नजर वाटली ती अभयाला. गळ्यातली ओढणी तिने अंगाभोवती लपेटून घेतली होती.

तेवढ्यात कोणी विक्रेता मोठ्या आवाजात त्याच्या हातातली वस्तूची जाहिरात करत गर्दीतून वाट काढत आला. मानवसुलभ कुतुहलाने तिने तिची नजर आत वळवली मात्र, त्याने लगेच डोळे वटारले आणि मानेनेच तिला नजर बाहेर वळवायची खूण केली. तिनेही गरीब गायीसारखी नजर खिडकीबाहेर वळवली. तेवढ्यात कुठलसं स्टेशन आलं. आता ती काय करेल? आणि तोही? अभयाला उत्सुकता होती. आता गाडीच्या आतही परपुरुष आणि बाहेरही. आता कुठे पाहील ती? पण त्याचा उद्दामपणा आणि तिचा आज्ञाधारकपणा दोन्ही मुरलेले. तिने नजर आत घेऊन स्वत:च्या पायांपाशी वळवली, ती गाडी थेट फलाटाबाहेर पडेपर्यंत. मग ती पुन्हा खिडकीबाहेर पाहू लागली. शून्यात.

तेवढ्यात समोरच्या बाकड्यावरच्या एकाला मोबाईलवर फोन आला. ''हो-हो. घरी येताना घेऊन येतो.'' -''हो, पण वेळ होईल मला. आत्ता कुठे भायखळ्याहून गाडी सुटलीय.'' तो बायकोशी बोलत होता. ''किती थापा मारतोय बघ. विक्रोळीपण गेलं मागे आणि म्हणे भायखळ्याहून गाडी सुटलीय.'' अभया अर्जुनपाशी कुजबुजली. गाडीत किती आवाज होते. शिवाय गाडीचा स्वत:चा आवाज होता. पण या सर्वांवर आवाज करून गाडीत स्पीकरवरून रेल्वेस्थानकांविषयी सूचना देणारी बाई बोलत होती, ''पुढील स्टेशन भांडुप, अगला स्टेशन भांडुप, नेक्स्ट स्टेशन भांडुप.'' हा घोषणा ऐकू गेली पाहिजे ह्याच्या बायकोला. थापाड्या कुठला. ओवाळायचं असेल कुठंतरी.'' अभया पुटपुटली. अर्जुनने मान डोलावली. बोलला मात्र नाही काही. 'ओवाळायचं?' आपली आई, आजी अशा जुन्या-जुन्या बायकांच्या तोंडी असलेला इतका जुनाट शब्द अभयाच्याही तोंडी? अर्जुनने मनातल्या मनात नोंद केली. अभया तरी काय करणार? 'पुरुषांनी तरी ओवाळायचं कुठं सोडलंय अजून?' गाडीही मनातल्या मनात पुटपुटली. तिने किती पुरुषांना पोहचवलंय आतापर्यंत त्यांच्या-त्यांच्या इच्छीत स्थळी. ती बिचारी काय करेल? ह्यांनी तिकीट काढलं की तिला पोहोचवावंच लागतं.


भांडुप स्टेशनात गाडी थांबली होती. अभयानं पाहिलं, फलाटावर एक भिकारीण आपल्या वाडग्यात जमलेली चिल्लर नवऱ्याच्या हातात देत होती. 'भिकारी तो भिकारी. बायकोला पोसायचीही क्षमता नाही, पण तिच्याच भिकेच्या पैशांवरही ह्याचा अधिकार-' अभयाला हे काही बोलवेनाच. तिने अर्जुनाला सांगून ठेवलंय की लग्नानंतर तिला तिची 'स्पेस' पाहिजे. अर्जुननेही मान डोलावलीय, अगदी नंदीबैलासारखी. पण पाहूया पुढे काय करतो ते. आजुबाजूची अशी चित्र पाहिली की अभयाचा आत्मविश्वास खच्ची होतो कधी-कधी.

भांडुप स्टेशनातून गाडी सुटली आणि गाडीने वेग घेतला. बाजूच्या ट्रॅकवरून दुसरी गाडी चालली होती. पाहता-पाहता अभया-अर्जुनच्या गाडीने त्या बाजूने जाणाऱ्या गाडीला मागे टाकले. त्या गाडीचा एकेक डबा, एकेक डबा मागे पडू लागला तसे अभयाचे डोळे चमकले.

''हेऽऽऽ'' अचानक तिच्या तोंडून उद्गार बाहेर पडला. ''हरले. हरले.'' म्हणत तिने त्या दुसऱ्या गाडीतल्या माणसांना हाताचा पंजाही हलवून दाखवला. पण सगळं इतक्या हळू आवाजात होतं की, फक्त अभयलाच ऐकू आलं. ''आपण शाळेच्या सहलीला जायचो, तेव्हा दुसऱ्या कुठल्या वर्गाच्या बसला मागे टाकलं की असेच ओरडायचो नाही रे?'' तिने अर्जुनला विचारलं. अर्जुनचे डोळे शाळेतल्या मिस्किल आठवणींनी लुकलुकत होते. अभयाच्या आनंदात सहभागी होत त्यानेही पाठी पडणाऱ्या गाडीतल्या माणसांना हाताचा पंजा हलवून दाखवला.

'आपला सहचर वेगळा आहे. इतर पुरुषांसारखा नाही. आपल्या आनंदात सहभागी होतोय. उद्या आपल्या वाट्याला एखादा कठीण प्रसंग आला तर तेव्हाही आपल्या पाठीशी उभा राहील तो.' अभयाच्या मनात आलं. तिने नुसतेच अर्जुनकडे वळून पाहिलं आणि विचारलं, ''काय?'' त्याने याही वेळी नंदीबैलासारखी मान हलवली. पण तिच्या मनातले प्रश्न त्याला थोडेच ऐकू आले होते? प्रश्नच ते. जेव्हा टोकदार होऊन आयुष्यात अवतरतील, तेव्हाच कळेल की ती टोकं बोथट करण्याचं सामर्थ्य तिच्या सहचरात आहे की नाही. की तोही टोपण घेऊन बसलाय, टोक अधिक टोकेरी करायसाठी?

हसरी रेखा -प्रदीप कोठारे



# प्रकाशातील परभू

## CXOs in Sports: Interciew with Anuj Mankar, CEO of Nautilus Mobile-developer of Real Cricket 14

By Aditya Jha/ Sportskeeda
Compiled by Shri Uday S. Mankar

Anuj Mankar is the CEO of Nautilus Mobile – the developer of the cricket game that recently hit the Android platform i.e. Real Cricket '14. The game has seen a terrific response from the fans and today, we have the game developer himself ready to answer some of our questions.

**Anuj, please tell us a little about Nautilus Mobile and your project, Real Cricket '14.**

Nautilus Mobile is an independent mobile game studio based in Hyderabad. The company is just one year old and Real Cricket '14 is its second project after NASSCOM People's Choice Game of the Year Winner – *Song of Swords*.

We have a small and extremely passionate team. Real Cricket '14 is an ambitious attempt to capture the mobile market and to slowly develop the game into a cricket simulation franchise. Although the early response is amazing, we do realize that we have to continue striving in order to meet our goal.

**The game has received much deserved critical approval, the critics have praised the game for the unique range of shots that it has on offer for the users of the game, which makes the game highly realistic. How hard was it to get this 'realistic' nature to the game?**

The idea from the outset was to provide a completely novel and unique art style not seen in sports games currently on the app stores. We used a completely hand drawn technique known as 2D motion capture to deliver the animations and shots.

As you pointed out – this brings immense realism as the shots mirror actual actions as seen in real matches on our televisions. As a result the game looks and feels fantastic. However, the inclusion of so many shots has caused the game to turn out quite heavy in terms of rendering and hence we are working on optimizing the game to run better on lower end devices.

**While working on the game, what were some of the 'key points' that you had in mind? We often see that in cricket games – whether on console, PC or Android platform, bowling is always a weakling which ruins the game for the 'bowling fans'. Was this a concern?**

At the outset, the idea was to deliver the best cricket game the world has seen on mobile. Obviously we found that with our small team and short deadline, this can't happen all at once with the first launch. We are constantly working on polishing every single aspect of the game and I am convinced that with some support from our audience and more hard work we will definitely be able to provide the best cricketing experience on the mobile platform.

**What was your first reaction to the final product? What are some 'implementations' to the game that you'd be emphasizing on in the next few months?**

My initial reaction to the product was not much different from a lot of the reactions we have received so far. The game definitely has immense promise and potential, and going by the ratings we have received so far – the game definitely also invokes some strong passion.

Over the next few months, we are concentrating on social integration, adding our "coming soon" game modes – Challenge Mode and the RCPL (Real Cricket Premier League). Along with this, we are working on optimizing the game in terms of performance and bugs whilst concentrating on delivering the game to support lower end devices as well.

**Is this the first Android platform game that you've worked on or have you been part of the development process of any other Android/ PC/console platform game too?**

As mentioned earlier – this is Nautilus Mobile's second game but first ever on Android. That said, several members of our team, including myself have worked on the Android platform before.

**Lastly, please tell our readers about the future projects of Nautilus Mobile and whether they can see you working on other sport games too or for the time being, it will be just cricket?**

At the moment, our hands are full of things to implement and integrate in Real Cricket. What you see out there is only 25% of the game!

So then, that was Anuj Mankar – explaining in detail about his future aspirations and aspects of RealCricket14.

Anuj Mankar and his team are on the venture of providing cricket enthusiasts with the perfect gaming platform and that too in their pockets literately i.e. through their Android phones.

You can download RealCricket14 for free through the Google PlayStore and if you like the game, you can surely help out this promising venture by an Indian studio – by the option of in-game purchases.

# युवामंच

## करियर ऑप्शन्

आजकाल करियरच्या अनेक नव्या वाटा खुणावू लागल्या आहेत. पण काही जुन्या वाटाही आजच्या संदर्भात बदलून महत्त्वाच्या ठरत आहेत. त्यातीलच एक म्हणजे अर्थशास्त्रतज्ञ असणे. पूर्वी 'आर्टस्' म्हणजेच कलाशाखा निवडून अर्थशास्त्रात पदवी घेता येत असे. बँक, सरकारी उच्चपदस्थ, आर्थिक सल्लागार अशा संधी त्यामुळे मिळत. आज अर्थशास्त्राशी निगडीत करियर महत्त्वाचे स्थान मिळवून आहे. कारण अर्थशास्त्राचा विकासाशी थेट संबंध असतो; आहे. आपला देश विकसनशील. म्हणून या विषयाचे महत्त्व अधिक. अर्थशास्त्राची पदवी मिळविल्यावर उद्योगधंदे, फायनान्शियल मॅनेजमेंट, बजेट प्लानिंग, ट्रेडिंग, स्पेशलायझेशन आदी क्षेत्रात सहजी वावरता येते. एमबीए, उच्च शिक्षण, लॉ, म्युच्युअल फंड, अध्यापन, पत्रकारिता, बँकिंग इत्यादी क्षेत्रात अर्थशास्त्रज्ञांना सहजी मागणी असते.

'कॉर्पोरेट वर्ल्ड' मध्ये अर्थशास्त्र पदवीधरांनी पुढे एमबीए केले असेल तर वाढती मागणी आहे. 'एमबीए'साठी अर्थशास्त्र हा पूरक विषय आहे. विदेशी कंपन्या अर्थशास्त्राची पार्श्वभूमी असलेल्यांना अधिक प्राधान्य देतात.

अर्थशास्त्राच्या पदवीनंतर 'लॉ' केल्यास 'लॉ' फर्ममध्ये चांगली मागणी असते. हल्ली व्यावसायिक पत्रकारितेला महत्त्व आहे. व्यापारावर आधारित अनेक वृत्तपत्रे आणि मासिकांना असे उमेदवार हवे असतात.

अर्थशास्त्राचे पदवीधर बँका आणि विमाक्षेत्रात स्वतंत्र करियर घडवू शकतात. 'इंडियन इकॉनॉमिक्स सर्व्हिस' साठीही पदवीधरांना प्राधान्याने वाव मिळतो. गणिक स्टॅटिस्टिक्स आणि अर्थशास्त्र यांचे संयुक्त रूप म्हणजे इकॉनॉमॅट्रिक्स. भविष्यात कोणत्या उत्पादनाची मागणी वाढेल याचा अभ्यास इकॉनॉमिक्सचे विद्यार्थी चांगल्या प्रकारे करू शकतात. मार्केटिंगच्या सध्याच्या जमान्यात अशा इकॉनॉमॅट्रिक्स विद्यार्थ्यांची फार गरज आहे.

अर्थशास्त्रात 'रेट ॲनॅलिसिस' म्हणजे मूल्यांकनाचा अभ्यास ज्यांनी केला आहे त्यांना बँकिंगमध्ये खूप मागणी आहे. संशोधनावर आधारित कंपन्या या विद्यार्थ्यांना उत्तम संधी देत असतात. 'फॉरेन करन्सी एक्स्चेंज' क्षेत्रातही अशांना भरपूर वाव असतो.

अर्थशास्त्र पदवीधर होऊन नंतर 'सिव्हील सर्व्हिसेस' किंवा 'स्टाफ रिक्रूटमेंट कमिशन'च्या परीक्षा देता येतात. त्यांना मागणी आहे.

'एन्व्हायरामेंटल इकॉनॉमिक्स' म्हणजे पर्यावरणीय अर्थशास्त्रात चांगल्या नोकऱ्यांची संधी असते. वायूप्रदूषण, विषारी पदार्थ, टाकाऊ वस्तू, जलसंपदा, ग्लोबल वॉर्मिंग इत्यादी बाबतीत अर्थशास्त्रज्ञांना अधिक संशोधनाच्या संधी आहेत.

शाळा, महाविद्यालय, विद्यापीठ आदी ठिकाणी अध्यापक म्हणून असे पदवीधर स्वत:चे स्वतंत्र स्थान निर्माण करू शकतात.

लेखांक-७

# केल्याने देशाटन

— हेमलता केशव कोठारे

एकूण ऑस्ट्रेलियाला विशाल समुद्र किनारा, निबीड अरण्ये, उत्तुंग पर्वतराजी, मोठ्ठे वाळवंट, अमाप नैसर्गिक साधनसंपत्ती लाभली आहे. त्यामुळे समृद्धी आणि सधनता आहे. मी पहिल्यांदा सिडनीला गेले तेव्हा तेथे उन्हाळा होता. दिवस ८।।-९ वाजेपर्यंत मोठा असे. त्यावेळी प्रकर्षाने जाणवलेली गोष्ट म्हणजे निळेभोर आकाश. प्रथमच अशी निळाई पाहिली. कारण तेथे हवेचे प्रदूषण नाही. तेथील वास्तव्यात मी बऱ्याचवेळा आकाशाकडे वेडी होऊन पाहत राही. त्या आकाशाच्या मी प्रेमातच पडले! वाचनात होते की महर्षी रमणांनाही हे आकाश फार फार आवडायचे. ते तासन्तास आकाशाकडे पाहत बसायचे. बघा! महर्षींची रसिकता माझ्यात उतरली! ह्या निळ्याभोर आकाशातील पौर्णिमेचा चंद्र आणि चांदण्या बघण्याचा योग तर फारच विलोभनीय! हो! आणखी एक विशेष म्हणजे ऑस्ट्रेलिया, कॅनडा, अमेरिका येथे ह्या निळ्या निळ्या आकाशात बहुतेक पांढरेशुभ्र ढग विराजमान असतात. केव्हाही पाऊस कोसळतो. ढगविरहीत आकाश दिसतच नाही. असे का? ते मात्र उलगडले नाही. असो.

आता गोऱ्यांच्या मानसिकतेविषयी लिहायचे तर मूळात त्यांची संस्कृतीच आपल्यापेक्षा वेगळी. भौगोलिक परिस्थिती वेगळी. येथे (कॅनडात) लहान मुले, ज्येष्ठ नागरिक, अपंग यांना सरकार भरपूर सवलती देते. उदा.- मूल जन्मल्यावर त्याला ठराविक 'अलाऊंस', संपूर्ण वैद्यकीय सुविधा (ह्या सगळ्यांनाच असतात), बारावीपर्यंतचे मोफत शिक्षण इत्यादी. बारावीनंतर विद्यापीठाचे शिक्षण मात्र स्वखर्चाने. महागडेही. त्यासाठी त्यांना अर्थाजन करून धडपडावे लागते. भारताप्रमाणे ही जबाबदारी येथे पालकांची नाही. कारण एकूण कुटुंबसंस्थाच डळमळीत. विलासी उपभोगाला जास्त महत्त्व. पु. ल. देशपांडे यांनी म्हटलंच आहे, 'त्यांची द्राक्ष संस्कृती, आपली रुद्राक्षसंस्कृती.' मात्र यामुळे येथील लहान मुलांचे आयुष्य प्रेमविरहीत, अस्थिर आहे. अगदी बाळ जन्मल्यापासून आई एका खोलीत, बाळ दुसऱ्या. बाळ रडले की मशीनवर समजते आणि आई त्याचेजवळ जाते. खरेतर आईची मायेची ऊब किती महत्त्वाची. स्पर्शसंवेदनेमुळे सुरक्षा, प्रेम, माया, जगण्यामधील सुंदरता... सगळेच मिळते. पण येथे जन्मत: बाळाची नाळ तुटते तशी आईची ऊबही. मग पुढे हीच मुले १७-१८ वर्षांची झाल्यापासून वेगळी, स्वतंत्र राहतात. ज्येष्ठ नागरिकही एकटे एकटे राहतात; आणि आपल्याकडे? मुलगा पन्नास वर्षांचा झाला तरी आईवडील त्याची काळजी वाहतात. पण अलीकडे या आपल्या भारतीय संस्कृतीला गालबोट लागले आहे. लग्नाशिवाय वैवाहिक संबंध ठेवणे, मुलांना फक्त आईचे नाव मिळणे, कुटुंब व्यवस्था अस्थिर असणे आता येथेही आली आहे. ऑस्ट्रेलिया, कॅनडात घटस्फोटाचे प्रमाण जास्त. एकट्या आईस (सिंगल मदर) सरकारकडून विशेष फायदे दिले जातात. त्याचाही इथे गैरवापर होतो. आपल्याकडे त्यांची ही वर्तणूक शिरलीय याचे वाईट वाटते. त्यामुळे पुढील पिढी भरडली जाणार आहे. परंतु अजूनही आपली भारतीय संस्कृती टिकून आहे. त्यामुळे अजूनही आपले भविष्यकालीन चित्र आशादायी आहे.

ऑस्ट्रेलियानंतर आता मी कॅनडातले माझे वास्तव्य इथे सांगणार आहे. चालेल ना? पहिल्यांदा मी टोरांटोला गेले ते मुलाकडे. त्याची गंमतच झाली. भारतातून दोनदा मला कॅनडाचा व्हिसा नाकारण्यात आला होता. तोच व्हिसा मला दोन तासात सिडनीहून मिळाला. हे व्हिसाप्रकरण मोठे विचित्रच.

भारत-ऑस्ट्रेलिया या प्रवासापेक्षा ऑस्ट्रेलिया-कॅनडा हा प्रवास लांबचा आहे. तो कसा करायचा ते मला माझ्या मुलाने (सुदेशने) नकाशावरून समजावले. पण माझे भूगोलाचे ज्ञान गोलगोलच! असो. चार ऑगस्ट २००८ मध्ये मी कॅनडात पहिले पाऊल टाकले. तेव्हा ऑस्ट्रेलियात हिवाळा चालू होता, तर कॅनडात उन्हाळा! मात्र उन्हाळा असूनही निसर्गदेवता हिरवीगार साडी ल्यायली होती. जिकडेतिकडे बहुरंगी फुले, फळे बहरली होती. आतापर्यंत न पाहिलेले एक झाड पाहण्यात आले. ते म्हणजे 'क्रिसमस ट्री'. आतापर्यंत फक्त चित्रातच पाहिले होते. पाने म्हणजे बारीक-बारीक सूयाच- हात लावला तर टोचते. हिवाळ्यात सर्व झाडांचे जेव्हा खराटे झालेले असतात तेव्हा 'क्रिसमस ट्री' मोठ्या दिमाखात उभी असते. लालचुटुक 'मेपल ट्री' ही खासच. मेपल ट्रीचे लालचुटूक पान कॅनडाच्या राष्ट्रीय ध्वजावर विराजमान आहे. कॅनडीयन कौन्सुलेटच्या प्रवेशद्वारावर हेच पान स्वागताला हजर असते. 'एअर कॅनडा' या एअरवेजच्या विमानाच्या शेपटावरही हेच मेपलचे लालचुटुक पान आकाशात विहरते. 'क्रिसमस ट्री' ची पाने म्हणजे मोठमोठे पंखेच. झाडाच्या बुंध्यापासून सुरू होणारी पाने जमिनीलाही टेकलेली असतात. एकावर एक थर दिल्याप्रमाणे वर-वर ती निमुळती होत जातात. शेवटी झाडाचे एक टोक. त्यामुळे झाडाचा आकार त्रिशंकूसारखा. काही काळपट हिरव्या रंगाची, तर काही राखाडी हिरवी. हिवाळ्यात पांढरेशुभ्र हिम लेवून ही झाडे हिवाळा साजरा करतात. येथे

(पान ६ कॉलम २ वर)

## पाठारे प्रभु सोशल समाज

### वार्षिक सर्वसाधारण सभेची

### अधिसूचना

पाठारे प्रभु सोशल समाजाची वार्षिक सर्वसाधारण सभा शुक्रवार, दिनांक १५ ऑगस्ट २०१४ रोजी प्रभु सेमिनरी शाळा सभागृह, भाई जीवनजी लेन, ठाकुरद्वार, मुंबई-४००००२ येथे सायंकाळी ५ वाजता घेण्यात येईल. सर्व सभासदांनी उपस्थित राहावे.

**सभेपुढील कामकाज**

१) सूचना परिपत्रकाचे वाचन.

२) समाजाच्या रविवार दि. २५ ऑगस्ट २०१३ रोजी झालेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेची टिपणे वाचून मंजूर करणे.

३) समाजाचा १ एप्रिल २०१३ ते ३१ मार्च २०१४ चा कार्यवृत्तांत अहवाल वाचून मंजूर करणे.

४) समाजाच्या कार्यकारिणीचा १ एप्रिल २०१३ ते ३१ मार्च २०१४ सालाचा जमाखर्चाचा ताळेबंद सादर करणे व मंजूर करून घेणे.

५) अध्यक्षांच्या परवानगीने आयत्यावेळेचे कामकाज.

**विशेष सूचना-**

१) गणसंख्येच्या अभावी सभा तहकूब झाल्यास तीच सभा, त्याच ठिकाणी, त्याच दिवशी आधी ठरलेल्या वेळेच्या अर्ध्या तासानंतर (म्हणजे ५.३० वाजता) घेण्यात येईल. त्यावेळी गणसंख्येचे बंधन राहणार नाही.

२) समाजाचा अहवाल व जमाखर्चाचा ताळेबंद याविषयी ज्या सभासदांना काही प्रश्न विचारावयाचे असतील त्यांनी ते लेखी स्वरूपात समाजाचे सं. चिटणीस श्री. जयंत कीर्तिकर, चंद्रकला, ३रा मजला, डिलीव्हरी पोस्ट ऑफिससमोर, ७वा रस्ता, खार(प.) मुंबई ४०००५२ येथे शुक्रवार दि. ८ ऑगस्ट २०१४ पर्यंत पाठवावेत.

*

## THE PATHARE PRRABHU CHARITIES

### Award of Educational Merit Prizes For the Year 2014

The Pathare Prabhu Charities have been awarding Educational Merit Prizes every year to students of our community passing various examinations with merit.

Students passing any examination SSC/CBSE/ICSE/IGCSE onward from recognized university/educational institution during this year are earnestly requested to submit the photocopies of their mark sheets in the office of the Pathare Prabhu Charities, Thakurdwar, between 11.00 a.m. and 5.00 p.m. after the result of the examination is declared but not later than **September 13, 2014** to enable the trustees to award the prizes to the eligible students. The students and parents concerned should note that the merit prizes will be awarded by the Trust only on the basis of the results/mark sheets received by the Trust before the dead line.

This year the Annual Eductional Merit Prize Award Function will be held on **Sunday November 30, 2014.**

Students are requested to furnish the following requirements along with the examination results/marks sheet.

1. Full Name of the Student (Married Female to give maiden name also)
2. Latest coloured photo of the student, postcard size with light background.
3. Full Postal Residential Address.
4. Telephone no.
5. Email adress if available.
6. Confirmation regarding student having bank account: Yes/No
7. Name of the Grandfather
8. Bio data in brief (past racord of academic career)
9. Confirmation whether the student will receive the prize if awarded, by his personal attendence at the function on the aforesaid date

Chief Guest : **Dr. Anand Vasantrao Pednekar**, M.B.B.S., G.P. and his wife **Mrs. Kalika Sadanand Talpade**

For the Board of Trustees,
**Uday S. Mankar**
Chairman-Trustee

## प्रभु तरुण आश्रयदाते

१) सौ. विमल व श्री. माधव नायक,
२) सौ. नलिनी व श्री. रविंद्र रामराव मानकर,
३) सौ. अनामिका बी. ए. एल.एल.बी.
४) कै. नटवर्य नारायण रामराव झावबा
५) कै. सॉ. मोतिराम विनायक जयकर
६) आद्य संपादक कै. विष्णु कृष्ण कोठारे
७) कै. रावसाहेब चंद्रकांत बालमुकुंद वेलकर
८) कै. सौ. सुशीला यशवंतराव कीर्तीकर
कै. सौ. सुशीला व श्री. मोरेश्वर वि. प्रधान
९) सौ. मीरा व श्री. रविंद्र नानूजी दळवी
१०) कै. सौ. शलाका (अरुणप्रभा) शैलकुमार श्रीकृष्णनाथ दळवी
११) कै. श्रीमती चंपुबाई आणि
कै. आनंदराव सुंदरजी धराधर
१२) कै. सौ. रोहिणी (रत्नप्रभा) श्रीकर राणे
१३) सौ. निलीमा व श्री. सूजन केशवराव राणे
१४) कै.श्रीमती रोझाबाई आणि कै. बाळाराम केरोबा नायक
१५) कै. शरद विनायक कीर्तिकर यांच्या स्मरणार्थ अनामिक
१६) कै. सॉ. दिलीप रघुनंदन कोठारे
१७) कै. श्रीमती कमलजा आनंदराव अजिंक्य
१८) कै. दिवाळीबाई व कै. डॉ. वामनराव आनंदराव विजयकर
१९) कै. विष्णुराज बाळाराम नायक
२०) ॲड. सदाशिव आनंदराव धुरंधर
२१) कु. कस्तूर मोठाबाई जयकर
२२) कै. कमलिनी रमाकांत प्रधान
२३) कै. नटवर्य शरद श्रीकृष्णनाथ गणपतराव दळवी
२४) आद्य मराठी लघुलिपीकार कै. भुजंगराव रामचंद्र मानकर
२५) कै. वामन मोरेश्वर प्रभाकर
२६) कै. चंद्रकांत नारायण विजयकर,
कै. कुंजविहारी वाय. जी. तळपदे,
कै. प्रविण चंद्रकांत नारायण, विजयकर,
कै. वैभव कुंजविहारी वाय. जी. तळपदे
यांच्या स्मरणार्थ एक हितचिंतक
२७) कै. डॉ. विद्याधर चंद्रकांत नारायण विजयकर यांच्या स्मरणार्थ हितचिंतक
२८) कै. पूर्णचंद्र केशरीनाथ राव व
कै. सौ. शीला पूर्णचंद्र राव यांच्या स्मरणार्थ
२९) डॉ. राम गोविंदराव नवलकर
३०) सौ. शुभांगी राम नवलकर
३१) सौ. रीटा आणि श्री. मंदार माधवराव नायक
३२) कै. सौ. विजया व श्री. प्रकाश माधव नायक या त्यांच्या आईवडिलांच्या स्मृत्यर्थ उन्मेष प्रकाश नायक

# प्रभुतरुणाची डायरी

## कुर्यात् बटोर्मंगलम्

११-०५-१४ रणवीर सिद्धार्थ प्रताप अजिंक्य
१५-०६-१४ अयान जयदीप विजयकर
(चुकीची दुरुस्ती:- गतांकी 'कुर्यात् बटोर्मंगलम्'मध्ये **राहील रितेश कीर्तिकर** असे कृपया वाचावे)

## नांदा सौख्यभरे

१६-०६-१४ कु. मैत्रेयी प्रदीप विजयकर, श्री. आदित्य कांबे

## विवाह माणिक महोत्सव

१८-०५-१४ कु. अंजली शंकर धुरंधर, श्री. उल्हास खंडेराव अजिंक्य

## मरण

१८-०६-१४ डॉ.श्रीमती इंदू विठोबा विजयकर वय, ८६ कुन्नुर

## प्रभुतरुणास देणगी

✳ सौ. अर्चना आणि श्री. उल्हास खंडेराव अजिंक्य यांजकडून त्यांच्या विवाहाच्या माणिक महोत्सवानिमित्त (१८-०५-२०१४) रु. ५०१/-

✳ सौ. ज्योती दिलीप व्यवहारकरकडून त्यांची कन्या सौ. नमिता विजय भोसले हिला १२-६-१४ रोजी कन्यारत्न (नाव- वंशिका) झाल्याप्रीत्यर्थ रु. २०१/-

सर्व देणगीदारांचे आभार.

## परीक्षेतील सुयश

**एसएससी**

| | |
|---|---|
| कु. अंजोर परेश कोठारे | ९३.५ % |
| कु. चैत्रा हरेश देसाई | ८० % |
| श्री. जय रोहन कोठारे | ७६ % |
| कु. आशिका पुष्पल विजयकर | ४४४/५०० |
| कु. किंजल सुघांशु व्यवहारकर | ४०६/५०० |
| कु. अपूर्वा अजय धराधर | ४६९/५०० ९३.८% |

**बारावी**

| | |
|---|---|
| कु. अदिती दिनार तळपदे | ५७२/६५० |

**खास पाठारे प्रभूंचा ताशा**
मुंजी, लग्न, वरघोडा आणि वरातीसाठी संपर्क:-
**श्री. मंगू ताशेवाला**
मोबाईल नं.:
९९२०५८२२६५/९९३०८३८६९९
पत्ता:
खोली क्र. ७, पहिला मजला,(जयश्री मसाला वर), बिल्डिंग नं. ६७/६९, कामाठीपुरा ७वी गल्ली, एम. आर. रोड, मुंबई-४०००08

## Hearty Congratulations



Hearty Congratulations to Mr. Rajdeep Prasad Trilokekar for receiving the coveted US Presidential Scholar Award conferred on those who have excelled in their educational, artistic and civic pursuits on 22nd June 2014 at Washington DC from Mrs. Michelle Obama.

Rajdeep is the son of Mrs.Neela & Prasad Trilokekar, the grandson of of Mrs. Kishori & Mr Shankar Gajanan Trilokekar and Mrs. Shobha & late Mr. Shivkumar S. Anandkar

## अभिनंदन

✳ श्री. उन्मेष प्रकाश नायक रिलायन्समध्ये सी. इ. ओ. झाले. अभिनंदन.

✳ श्री. सतीश किशोर कीर्तिकर 'स्नेक्मा' कंपनीत 'व्हाईस प्रेसिडेंट' (बिझनेस मॅनेजमेंट) झाले. अभिनंदन.

✳ सौ. गीता आंबवणे (पूर्वाश्रमीच्या धराधर) यांना 'इनरव्हिल डिस्ट्रिक्ट असेम्ब्ली' मध्ये 'सिनियर पिलर ऑफ द क्लब' हा सन्मान प्राप्त झाला. तसेच रोटरी क्लबतर्फे भिवंडीत त्यांनी पुढाकार घेऊन सतराशे गरीब विद्यार्थ्यांना झोपडपट्टीत जाऊन नाश्ता वाटप केले. अभिनंदन.

✳ सौ. कविता राजस राणे यांना कोटक महिंद्र बँकेत चीफ मॅनेजरपदी बढती मिळाली. अभिनंदन.

✳ Mr. Sanil Talpade (son of Mrs. Neelam and Shri Anil Baburao Talpade, Rtd. ACP, Crime Branch)- an SMTS IT Engineer, R and D Onsite- Canada was part of the team that completed a major data centre consolidation effort which was adjudged Gold Winner for project of the year at the 9th Annual 2014 HOT companies and Best Awards. Congratulations.

(पान २ कॉलम ४ वरून)
आहे. त्याकरिता आपण स्वत: आणि आपली पुढील पिढी या मोबाईलच्या दुनियेतून लवकरात लवकर बाहेर पडावी अशी आशा करते. याचे कारण एकच. आपल्या मुलांना नात्याचे महत्त्व समजावे आणि मुख्यत: त्या नात्यांना जपून त्यांचा आदर करावा. 'इफेक्टिव्ह कम्युनिकेशन'चे महत्त्व आपल्या मुलांनी जाणावे ही अत्यंत गरजेची गोष्ट आहे.

आपण कितीही नाही म्हटले आणि स्वत:ला निर्दोष नाही मानले तरी ही वस्तुस्थिती आहे की आपल्या नात्यांमध्ये एक प्रकारची पोकळी निर्माण झाली आहे, जी आपण नजरेआड करीत आहोत. आता वेळ आहे हा प्रश्न स्वत:लाच करण्याचा की, 'हा अबोला का आणि का हा दुरावा?' हे प्रश्न विचारले गेले नाहीत तर याच्या पुढच्या प्रश्नाचे उत्तर मागण्याचा अधिकार आपण गमावून बसू. आज जर आपण या निराशाजनक वस्तुस्थितीला नजरेआड केले तर तो दिवस दूर नसेल जेव्हा आपल्याकडे उत्तर नसेल की हा दुरावा कसा मिटेल? तेव्हा मनात तो प्रश्न घर करेल की, 'अपराध माझा असा काय झाला?' परंतु त्याचे उत्तर 'चॅट'द्वारेही मिळायचे नाही. आणि पुन्हा एकदा मनात तोच प्रश्न येतच राहील, 'का रे अबोला???'

✳

(पान ५ कॉलम ४ वरून)
बाराही महिने पाऊस पडतो. मी प्रथम टोरांटोला गेले तेव्हा क्षमा (माझी सून) सुदेशला विचारायची- 'क्लायमेट काय आहे?' मला सुरुवातीला हा प्रश्नच कळला नाही. मग सुदेशने सांगितलं, 'अगं, तापमान फारच कमी असेल तर ती तसे कपडे घालते. पाऊस असेल तर रेनकोट-जॅकेट घालते.' रोज सकाळी टीव्हीवर त्या दिवसाचे सकाळ, संध्याकाळ, रात्रीचे तापमान सांगण्यात येते. अन् हो! हे तापमान अचूक असते!

कॅनडातील माझा पहिला अनुभव उन्हाळ्याचा. सृष्टीसौंदर्य लुटायचे तर ते कॅनडातच. नव्या नवरीची झळाळी सृष्टीला आलेली असते. येथली घरे, इमारती, मॉल, रस्ते यांची रचना ऑस्ट्रेलियापेक्षा वेगळी वाटली नाही. येथेही लाकडी सांगाड्यावर निरनिराळ्या रंगाच्या विटांची बांधणी केलेली असते. पण सर्वात मोठा फरक म्हणजे कॅनडा, अमेरिकेत घरांना तळघर (बेसमेंट) असते, ते ऑस्ट्रेलियात नसते.

✳

हे मासिक मुद्रक, प्रकाशक श्रीमती सुहासिनी कीर्तिकर यांनी मालक बोर्ड ऑफ कंट्रोल प्रभुतरुण करिता मे. स्नेहेश प्रिंटर्स, ३२०-अ, शाह अँड नाहर इंडस्ट्रीयल इस्टेट, अ-१, धनराज मिल कंपाऊंड, सीताराम जाधव मार्ग, लोअर परेल, मुंबई-४०००१३ येथे छापून पारिजात बी-३, युनियन बँक एम्प्लॉईज को-ऑप. हौ. सोसायटी, पटेल इस्टेट, जोगेश्वरी (प.), मुंबई-४०००१०२ येथे प्रकाशित केले.
संपादक: श्रीमती सुहासिनी कीर्तिकर RNI NO. 14613/67